# पुणे महानगरपालिका
# * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक ४९

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **बुधवार दि. २०/२/२०१९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

**विषय क्र. २५२५**

पुणे महानगरपालिका क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनिस्त क्षेत्रिय कार्यालयांच्या माहे जानेवारी २०१९ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/क्षेआप२/१३२० दि.७/२/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २५२६**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ४ कार्यालयाचे नियंत्रणाखालील हडपसर–मुंढवा, वानवडी–रामटेकडी, कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयांकडील दि. १/१/२०१९ ते दि.३१/१/२०१९ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ४ यांचे जा.क्र. समआ–४/५३८६ दि.८/२/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २५२७**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील क्षेत्रिय कार्यालयांकडील दि. १/१/२०१९ ते दि. ३१/१/२०१९ पर्यंतच्या कामकाजाचा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे जा.क्र. मआ/उआप–३/८८५७ दि.१३/२/२०१९ चे पत्र.

### मा.सभासदांचा प्रस्ताव

**विषय क्र. २५२८**

मा.ॲड्.भैय्यासाहेब जाधव यांचे दि.१४/२/२०१९ चे पत्र.

संपूर्ण शहरामध्ये मुस्लिम महेदविया समाजाचे ५०,००० हून अधिक नागरिक राहतात. या समाजातील नागरिक हे मृत व्यक्तींना दफन करणेसाठी पवना धरण परिसरातील मावळ तालुका येथील निकमवाडी गावाच्या परिसरात दफन करणेसाठी जातात. या समाजातील नागरिकांना शहरामध्ये कोठेही दफनभुमी उपलब्ध नाही. यामुळे समाजातील नागरिकांची अत्यंत गैरसोय होत आहे.

सबब या समाजातील नागरिकांना दफनभूमी उपलब्ध करुन देणे पुणे महापालिकेचे कर्तव्य आहे. याकरिता पुणे महानगरपालिका हददीतील नगर रोड परिसरातील बी.यु. ८ हे आरक्षण ताब्यात घेवून सदर जागेवर मुस्लिम महेदविया समाजातील नागरिकांसाठी दफनभुमी सुरु करण्यात यावी.

### माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. २५२९**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि. १६/१/२०१९ ते दि. ३१/१/२०१९ पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि–४/१३१९ दि.६/२/२०१९ चे पत्र.

## सर्वात कमी रकमेचे टेंडर्स

**विषय क्र.२५३०**

उंड्री चौक ते वडाची वाडी रस्त्याने अंतर्गत भागात जलवाहिनीचे नेटवर्क विकसीत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.नबिलाल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२९,१७,६४७=०४ पेक्षा ६.९०% जास्त) असल्याने त्यांचेकडून (स्थापत्य कामे र.रु.२६,०५,०४२/- + ६.९०% जास्त) र.रु. २७,८४,७८९=९ पर्यंत अधिक प्रचलित दराने होणा-या वस्तु व सेवा कर र.रु.३,३४,१७४=७९ असे एकुण र.रु.३१,१८,९६४=६९ अधिक डी. आय पाईपसाठी सर्वसाधारण व विशेष भाववाढ सुत्रानुसार येणारी फरकाची जादा रक्कम देणेस अगर कपात होणाऱ्या रकमेपर्यंतचे काम आवश्यक ती रक्कम स्पिल ओव्हरने उपलब्ध घेऊन त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पापु/१३५० दि.१२/२/२०१९ चे पत्र.
(टिप :- वित्त उपलब्धतेच्या मर्यादेत मान्यतेस्तव सादर)

**विषय क्र. २५३१**

आंबेगाव गावठाण व दळवीनगर भागात जी.आय.लाईन ऐवजी डी.आय.लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.शंकरलिंग एंटरप्रायजेस् यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३२,८२,९२८/- पेक्षा ५.८०% जास्त) असल्याने त्यांचेकडून (स्थापत्य कामे र.रु.२९,३१,१८६/- + ५.८% जास्त) र.रु. ३१,०१,१९४=७९ पर्यंत अधिक प्रचलित दराने होणा-या वस्तु व सेवा कर र.रु.३,७२,१४३=३७ असे एकुण र.रु.३४,७३,३३८=१६ अधिक सर्वसाधारण व विशेष भाववाढ सुत्रानुसार फक्त डी. आय. पाईपसाठी येणारी फरकाची जादा रक्कम देणेस अगर कपात करणेस, उपलब्ध रकमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पापु/१३५१ दि.१२/२/२०१९ चे पत्र.
(टिप :- वित्त उपलब्धतेच्या मर्यादेत मान्यतेस्तव सादर)

**विषय क्र. २५३२**

पुणे मनपाच्या पाणीपुरवठा खात्याकडील विविध जलकेंद्रासाठी पॉलीॲल्युमिनियम क्लोराईड द्रावण पुरविणे (IS 15573:2018 नुसार) (मेक-ग्रासिम/GAC/अर्किल) या कामी टेंडर्स मागविण्यात आली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी सर्वात कमी दर देणारे निविदाधारक १) मे.स्वानंद ट्रेडर्स प्रा.लि. २) मे.एस.व्ही.एस.केमिकल कॉर्पोरेशन ३) मे.केमिकल पीपल, यांचेकडून खरेदी करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ई) यांचे जा. क्र. मआ/पापु/१३५२ दि.१२/२/२०१९ चे पत्र.

१) मे.स्वानंद ट्रेडर्स प्रा.लि., मे.एस.व्ही.एस.केमिकल कॉर्पोरेशन, मे.केमिकल पीपल, यांचेकडून रक्कम रु.११,८७५/- प्रति मे.टन सर्व करांसह या दराने अ.क्र. ५०:३०:२० नुसार १६६४ मे.टन (मे.स्वानंद ट्रेडर्स प्रा.लि.), ९९८.४ मे.टन (मे.एस.व्ही.एस.केमिकल कॉर्पोरेशन), ६६५.६ मे.टन (मे.केमिकल पीपल) याप्रमाणे एकूण ३३२८ मे.टन याप्रमाणे एकूण र.रुपये ३,९५,२०,०००/- पर्यंत पी.ए.सी. द्रावण खरेदी करणेस
२) वरील क्र. १ मध्ये नमुद केल्याप्रमाणे खरेदीसाठी करारनामा करणेस व अनामत रक्कम भरुन घेणेस
३) वरील प्रमाणे खरेदी केलेल्या परिमाणांचे बिल पुरवठादारास अदा करणेस.
(टिप - चालू आर्थिक वर्षाच्या बजेट तरतुदीच्या मर्यादेत मान्यतेस्तव सादर.)

**विषय क्र. २५३३**

पुण्यधाम आश्रम ते कडकनगर चौक दरम्यान १२ व्यासाची एम.एस.जलवाहिनी विकसीत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सायली कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२९,१७,६७५=०४ पेक्षा ३.५५६७% जास्त) असल्याने त्यांचेकडून (स्थापत्य कामे र.रु.२६,०५,०६७/- + ३.५५६७% जास्त) र.रु. २६,९७,७२१=४२ पर्यंत अधिक प्रचलित दराने होणा-या वस्तु व सेवा कर र.रु.३,२३,७२६=५७ असे एकुण र.रु.३०,२१,४४७=९९ अधिक डी. आय. पाईपसाठी सर्वसाधारण व विशेष भाववाढ सुत्रानुसार येणारी फरकाची जादा रक्कम देणेस अगर कपात होणाऱ्या रकमेपर्यंतचे काम आवश्यक ती रक्कम स्पिल ओव्हरने उपलब्ध करुन घेऊन त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पापु/१३५३ दि.१२/२/२०१९ चे पत्र.
(टिप :- GST वगळून निविदा मान्यतेस्तव सादर)

**विषय क्र.२५३४**

स.नं. ३९ कोंढवा खुर्द येथे क्रिडांगण विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.राजेश संपतराव कदम यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,२७,००,०३४=६० पेक्षा १०.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. १,१४,३०,०३१=१४ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १५,२४,००४=१५ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ३,०४,५९०=२४ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये २,३८,३३७=०१ पर्यंत अधिक टेंडर अटीशर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१३५५ दि.१३/२/२०१९ चे पत्र.

**विषय क्र.२५३५**

प्रभाग क्र.४१ अ कोंढवा बु, मधील स.नं.२० प्ले ग्राउंडच्या जागेवर प्ले ग्राउंड विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.निलेश तरवडे कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५०,५२,६०३/- पेक्षा ॲटपार) असल्याने त्यांचेकडून र.रु.५०,५२,६०३/- पर्यंत काम करुन घेणेस अधिक जी.एस टी र.रु.६,०६,३१२=३६ पर्यंत अधिक रॅायल्टी चार्जेस र.रु.१,१७,८७७=५६ मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.२८,३५१=०० पर्यंत अधिक टेंडर अटीशर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१३५६ दि.१३/२/२०१९ चे पत्र.

**विषय क्र.२५३६**

कोथरुड नवीन बाल नाट्य गृहातील उभारणेचे कामामधील बाल नाट्य गृहातील उंचीवरील इंटेरिअरची कामे व इतर तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार दि रायकॅान कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६४,७४,३०२/- पेक्षा ॲटपार दराने) असल्याने त्यांचेकडून
र.रु.६४,७४,३०२=०० उपलब्ध तरतुद रकमेपर्यंत काम करुन घेणेस अधिक जी.एस.टी. र.रु.७,७६,९१६=२४ अधिक मटेरियल टेस्टींग र.रु.९२४०/- पर्यंत निविदा अटी शर्तीनुसार सिमेंट,स्टील या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१३५७ दि.१३/२/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २५३७**

पुणे शहरातील विविध पुलांचे सुशोभिकरण दुरुस्ती विषयक व तद्नुषंगिक कामे करणे (भाग-२) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.निखिल कंन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८७,४७,१५४/- पेक्षा ११.११% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७७,७५,३४५=१९ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ९,३३,०४१=४२ पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटी शर्तीनुसार डांबर, स्टील, सिमेंट व विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/१३५८ दि. १३/२/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २५३८**

प्रभाग क्र. २० ड मध्ये डॉ.आंबेडकर उद्यान ते साधुवासवानी चौक रस्ता काँक्रीट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.प्रितम गंजेवार इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२६,३६,८६९=८६ पेक्षा ०.९९९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२६,१०,५०१=४२ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ३,१६,४२४=३९ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये २२,८९७=०७ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये २३,७३२/- पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटीशर्तीनुसार डांबर, स्टील सिमेंट या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१३५९ दि.१४/२/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २५३९**

प्रभाग क्र. २० ड मध्ये कौसिंल हॉल समोरील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.प्रितम गंजेवार इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२६,३६,८०१=२० पेक्षा ०.९९९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२६,१०,४३३=४५ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ३,१६,४१६=१५ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये २२,८९७=०७ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये २३,७३२/- पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटीशर्तीनुसार डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१३६० दि.१४/२/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २५४०**

प्रभाग क्र. १३ कोथरुड करिष्मा सोसायटी समोरील व मृत्युंजय मंदिरामागील कॅनॉल रोडचे डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.एस.साठे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४६,२५,१०५/- पेक्षा ०.९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४५,७८,९००=२० पैकी उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ५,४२,३३९=४० पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये २७,५६१=३० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ३२,९७१/- पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटीशर्तीनुसार डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१३६१ दि.१४/२/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २५४१**

प्रभाग क्र. १९ अ मधील लोहियानगर, एकबोटे कॉलनी परिसर, टिंबर मार्केट परिसर येथे मिलिंग करुन रस्ते डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री.सदगुरु कृपा डेव्हलपर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४३,९१,६४६/- पेक्षा ०.२५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४३,८०,६६६=८८ पर्यंत काम करुन घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ५,२६,९९७=५२ अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ७४,०८४/- टेंडर अटीशर्तीतील विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१३६२ दि.१४/२/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २५४२**

धानोरी लोहगांव-वाघोली रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.गणेश एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८७,५१,५४२=४० पेक्षा १८.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७०,८९,६२४=४९ उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करुन घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,४८,९५३=२९ पर्यंत अधिक रॉयल्टी र.रुपये १,३७,३८२=४८ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ४६,८३७/- अधिक टेंडर अटीशर्तीतील विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१३६३ दि.१४/२/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २५४३**

आंबेगाव कात्रज शिवेवरील रस्ता मैत्री चौक परिसर येथे फुटपाथ करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अविष्कार राजेंद्र घोलप यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३९,६१,८७३/- पेक्षा १३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३४,४६,८२९=५१ पैकी उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ४,७५,४२४=७६ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ५३,००२=५० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ९,१३५/- पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटीशर्तीनुसार डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१३६४ दि.१४/२/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २५४४**

प्रभाग क्र. २६ व स.नं. १७, १८ मधील रस्ते व महंमदवाडी स.नं. १७, १८ मधून जाणारा १८ मी.डी.पी.रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस ॲण्ड जे बिल्डकॉन प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३,३९,४१,३६९/- पेक्षा ०.९९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३,३६,०१,९५८=७० पैकी उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक

जी.एस.टी. र.रुपये ४०,७२,९६४=२८ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ८४,०६०/- अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ५,२३,६६४=७० अदा करणेस, अधिक टेंडर अटीशर्तीनुसार विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१३६५ दि.१४/२/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २५४५**

पुणे शहरातील बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत कॉंक्रीट व डांबरी रस्त्याचे रोड मेंटनन्स व्हॅनव्दारे वार्षीक देखभाल दुरुस्ती व इतर तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सनराज कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८९,१५,५६०/- पेक्षा १०.४०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ७९,८८,३४१=७६ उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करुन घेणेस व त्यांचे बरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रु १०,६९,८६७=२० पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०=०० पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.१३,८६०/- पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटीशर्तीनुसार डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा /कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१३६६ दि.१४/२/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २५४६**

पथ विभागाकडील प्रभाग क्र. २८, ३६ व ३७ कार्यक्षेत्रातील एम.एन.जी.एल. रिलायन्स व इतर कंपन्यांनी केलेल्या केबल खोदलेल्या ठिकाणी रिईनस्टेटमेंट करणे व इतर दैनंदिन दुरुस्ती विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.ए.डी.एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८९,२६,८८८=१३ पेक्षा १४.०४% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७६,७३,५५३=०३ पैकी उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,७१,२२६=५८ पर्यंत अदा करणेस, अधिक टेंडर अटीशर्तीनुसार विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१३६७ दि.१४/२/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २५४७**

हडपसर मतदार विधानसभा मतदार संघातील प्रभाग क्र. २७ मधील कोंढवा खुर्द शिवनेरी नगर, भाग्योदय नगर, मिठानगर परिसरातील विद्युत वाहिनी भुमिगत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १० टेंडर्सपैकी ठेकेदार मे.के.के. इंजिनिअरिंग सर्व्हीसेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३४,९९,८०४/- पेक्षा २४.४०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२३,६२,३६७=७० अधिक जी.एस.टी. १२% र.रुपये २,८३,४८४=१२ असे एकूण र.रुपये २६,४५,८५२/- जीएसटीसह पर्यंत काम करुन घेणेस व त्यांच्याशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१३६८ दि.१४/२/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २५४८**

प्रभाग क्र. ३६ ड मधील धवलगिरी परिसर रस्ते कॉंक्रीटीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.स्वप्नील बाबासाहेब बांगर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४४,२२,६१७=५० पेक्षा ११% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३९,३६,१२९=५७ उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करुन घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ५,३०,७१४=१० पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये १९,७८७=६० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये २६,७२५/- अधिक टेंडर अटीशर्तीतील विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१३६९ दि.१४/२/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २५४९**

हडपसर मतदार विधानसभा मतदार संघातील प्रभाग क्र.२२,२३ मधील शिंदेवस्ती जहांगिरनगर, भिमनगर, माळवाडी, हडपसर परिसरातील विद्युत वाहिनी भुमिगत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.न्यु.सोलर इलेक्ट्रिकल्स ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५९,९९,९५८=७२ पेक्षा २३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४१,२४,९७२/- अधिक जीएसटी रक्कम रुपये ४,९४,९९७/- असे एकुण रक्कम रुपये ४६,१९,९६९/- जीएसटीसह पर्यंत करुन घेणेस व त्यांच्याशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१३७० दि.१४/२/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २५५०**

क्षेत्रिय कार्यालय व अतिक्रमण कार्यालयाकडे कार्यरत असणारी सरासरी आयुर्मान संपलेली युटीलिटी संवर्गातील वाहने निरस्त करुन नवीन वाहने खरेदी करणे (बी – २ पद्धतीने) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एन.जी.सेल्स, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून विशेष सरकारी किंमत र.रु.८,९२,४९२/– अधिक जीएसटी २८% र.रु. २,४९,८९७/– असे एकूण र.रु.११,४२,३८९/– जीएसटी २८% व वाहतुक, ट्रान्झिट विमा, सीआरटीएम इ.सह प्रती नग वाहन याप्रमाणे ९ नग वाहनांकरीता र.रु.१,०२,८१,५०१/– (अक्षरी एक कोटी दोन लाख ऐक्यांशी हजार पाचशे एक फक्त) पर्यंत जीएसटी २८% व वाहतुक, ट्रान्झिट विमा, सीआरटीएम इ.सह खरेदी करणेस व खरेदीकामी त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/१३७८ दि.१४/२/२०१९ चे पत्र.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. २५५१**

समाविष्ट २३ गावांमधील प्रमुख रस्त्यांची रुंदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २१०(१)(ब) अन्वये वाढविणेबाबत मा.आबा बागुल यांचे दि. २१/८/२०१८ चे फेरविचाराच्या पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ९७८ दि.२८/८/२०१८ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/शहर अभि./६३४ दि.२६/१०/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि.१६/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २५५२**

पुणे पेठ बिबवेवाडी प्रभाग क्र.७० ब, स.नं.६८०/६८१ (पार्ट) येथील यशवंतराव चव्हाण माध्यमिक शाळेमधील कै. शकुंतला किसनराव शिंदे क्रीडा संकुलाचा बॅडमिंटन हॉल लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरीता चालविणेस देणेकरीता निविदा मागविल्या असता आलेल्या ७ निविदापैकी सर्वात जास्त दर देणारे अ.क्र.१ चे निविदाधारक शिवराज शिक्षण संस्था, कृष्णाई प्लॉट नं ३२, लेक व्युव्ह कॉ.ऑप. सोसायटी सुखसागरनगर,पुणे-४६ यांनी देऊ केलेले वार्षिक भाडे र.रू. ४,३०,०००/-( र.रू. चार लाख तीस हजार फक्त) मनपाने निश्चित केलेल्या वार्षिक भाडे रक्कमेपेक्षा ८१.२४% ने अधिक रकमेची असल्याने त्यांची निविदा स्विकृत करणेस व निविदा अटी व शर्ती नुसार त्यांच्याबरोबर करारनामा करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/क्री.वि./५९५,दि.१५/१०/२०१८ चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र. २६९ दि.२६/१०/२०१८ विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि.१६/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २५५३**

मा.सौ.अश्विनी कदम यांचे दि. ११/१२/२०१८ चे पत्र.

यंदाच्या वर्षी संपूर्ण महाराष्ट्रात पाऊस कमी पडल्यामुळे दुष्काळाची स्थिती निमार्ण झालेली आहे. शासनाने सुध्दा दुष्काळ जाहिर केलेला आहे. अश्या परिस्थिती पुणे शहरावर सुध्दा पाणी कपातीचे संकट आलेले आहे. पुणे शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या चारही धरणांमध्ये पाणीसाठा कमी झालेला आहे. पुढील पावसाळ्यापर्यंत पाणी काटकसरीने व काटेकोरपणे वापरावे लागणार आहे. येणाऱ्या उन्हाळ्यापर्यंत भिषण परिस्थिती निर्माण होऊ शकते.

त्यासाठी आत्ताच पुणे महानगरपालिकेने पाऊले उचलून पुणे शहरात होत असलेली कॉंक्रिट रस्त्यांची कामे व गल्लीबोळ कॉंक्रिटीकरण करणे किंवा तत्सम कामे ज्याला पाणी मुबलक लागते अशा कामांना बंदी घालावी व दुष्काळ्याचा परिस्थितीस सामोरे जाण्यासाठी योग्यती तयारी करावी.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि.१६/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २५५४**

पुणे पेठ कोथरुड स.नं. १४७, हि.नं.२+१अ व २/ब+३+४+५/अ येथील PMPML & ST साठी आरक्षित असलेली ९ आर व १८ आर क्षेत्र जमीन संपादन करणेची कार्यवाही सुरु करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शअ/६४८ दि.३०/१०/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१४/२/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २५५५**

अलंकार थिएटरजवळ रेल्वे ओव्हरब्रिज बांधणे या कामास सन २०१८-१९ साठी उपलब्ध अंदाजपत्रकीय तरतूद अपुरी असल्याने वर्गीकरणाद्वारे या कामासाठी र.रुपये ४६० लक्ष इतकी आर्थिक तरतूद उपलब्ध करून देणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/७७८ दि.४/१२/२०१८ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक, मुख्य अभियंता (प्रकल्प), शहरातील नदी सुधारणा कामे करणे, तद्नुषंगिक कामे करणे.(CE20D219/L2-) मधील अ.क्र.३ नदी सुधारणा प्रकल्प राबविणे (PPP/कर्ज/अनुदान/इतर वित्तीय माध्यमातून नदी व नदीकाठ विकसित करणे/सुधारणा करणे) | ४,६०,००,००० | ---- |
| सुचविलेले काम<br>मुख्य अभियंता (प्रकल्प), शहरातील विविध ठिकाणी पूल बांधणे, उड्डाणपूल बांधणे, भुयारी मार्ग करणे या कामाअंतर्गत बजेट हेड (CE20D170/L1-) मधील अ.क्र.५ अलंकार थिएटर जवळ रेल्वे ओव्हरब्रीज बांधणे | ---- | ४,६०,००,००० |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१४/२/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २५५६**

पुणे मनपाच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकतील शिल्लक राहणाऱ्या रकमेतून पुणे महानगरपालिकेच्या सेवक व निवृत्त सेवक यांचे वैद्यकीय सहाय्य योजनेच्या बिलांच्या प्रतिपूर्तीसाठी र. रु. ५,००,००,०००/- (अक्षरी :- पाच कोटी फक्त) खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/९९५ दि.५/१/२०१९ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका, शहरामध्ये नव्याने दवाखाने, प्रसतुतीगृह बांधणे, दवाखान्यासाठी विविध उपकरणे खरेदी करणे, विविध विकास कामे करणे. CE17A242/ SJ6-93, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय | ५,००,००,०००/- | ---- |
| नविन सुचविलेले काम<br>आरोग्य कार्यालय, ७ क रूग्णालय व प्रसतुतीगृह व औषाधलय इ., RE17F153 D, ब२. मनपा सेवकांसाठी रिएम्बर्समेंट | ---- | ५,००,००,०००/- |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१४/२/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २५५७**

मा.स्थायी समितीने मान्य केलेल्या टेंडर क्रमांक ४५ सन २०१७-१८ व सन २०१८-१९ मधील मान्य ठेकेदार श्री एंटरप्राईजेस व दिशा एजन्सी यांचेकडून अनुक्रमे कमला नेहरू रूग्णालय व १.राजीव गांधी हॉस्पिटल २.जयाबाई सुतार हॉस्पिटल ३.डॉ.नायडू सांसर्गिक रूग्णालय ४.सोनावणे हॉस्पिटलकडील अंतर्गत व बाहय परिसराची जंतुनाशकासहित यांत्रिकी पध्दतीने साफसफाईचे काम पुढील पाच महिने मुदतीकरीता (ऑक्टोबर २०१८ ते मार्च २०१९पर्यंत) करणेकामी रक्कम रूपये २,६५,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये दोन कोटी पासष्ट लाख फक्त ) पर्यंत वर्गीकरणाव्दारे आर्थिक तरतूद उपलब्ध करून देणेस व त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस,बिलांची रक्कम अदा करणेस तसेच वाढीव औषधे खरेदी करणेकामी र. रु. २,६५,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये दोन कोटी पासष्ट लाख फक्त) खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/९९६ दि.५/१/२०१९ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका, शहरामध्ये नव्याने दवाखाने, प्रसतुतीगृह बांधणे, दवाखान्यासाठी विविध उपकरणे खरेदी करणे, विविध विकास कामे करणे. CE17A242/ SJ6-93, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय | २,६५,००,०००/- | ---- |

| | | |
|---|---|---|
| नविन सुचविलेले काम<br>आरोग्य कार्यालय, ७ क रूग्णालय व प्रसतुतीगृह व औषाधलय इ., RE17F140B, कमला नेहरु रुग्णालयांकडील व इतर रुग्णालय येथे विविध सेवक वर्ग ठेकेदार पध्दतीने नेमणे | ---- | २,६५,००,०००/- |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१४/२/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

**विषय क्र. २५५८**

पुणे, पेठ बाणेर स.नं. १०४/१, १०५/३ येथील पी.एम.टी. -१ आरक्षण क्षेत्र ७११५.०० चौ.मी. व पार्किंग (पी-७) आरक्षण क्षेत्र ४०००.०० चौ.मी. या आरक्षित जागेकरिता जागामालक सौ.इंदिरा शेट्टी यांनी पुणे म.न.पा.स महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम कलम १२७ अन्वये बजावलेल्या परचेस नोटीसचे अनुषंगाने भूसंपादनाची कार्यवाही सुरु करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शहर अभि./१३४० दि.११/२/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २५५९**

रक्कम रू. ६३ कोटी १ वर्ष, ३६५ दिवस, ३६६ दिवस किंवा त्यापेक्षा कमी मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/१३७१ दि. १४/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २५६०**

रक्कम रू. १४७ कोटी १ वर्ष, ३६५ दिवस, ३६६ दिवस किंवा त्यापेक्षा कमी मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/१३७२ दि. १४/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २५६१**

रक्कम रू. २१० कोटी १ वर्ष, ३६५ दिवस, ३६६ दिवस किंवा त्यापेक्षा कमी मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/१३७३ दि. १४/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २५६२**

रक्कम रू. ९० कोटी १ वर्ष, ३६५ दिवस, ३६६ दिवस किंवा त्यापेक्षा कमी मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/१३७४ दि. १४/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २५६३**

महापौर चषक २०१८-२०१९ सिलबंम, खो-खो व पुणे महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागातील विद्यार्थ्यांच्या महापौर चषक क्रिडा स्पर्धाच्या आयोजनास व त्याप्रित्यर्थ होणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/क्रीडा/१३७७ दि.१४/२/२०१९ चे पत्र.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**